MHLA050003692021

लवाद नियमित दरखास्त क्र. ११३३/२०२१
आनंद विरुध्द भुसंपादन अधिकारी

**<u>आदेश नि.क्र. २१ वर</u>**

धनको यांनी या अर्जाद्वारे कागदपत्र दाखल करुन घेण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर ऋणको क्रमांक १ यांनी म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. धनकोच्या वकीलांचे म्हणणे असे की, या प्रकरणाचा गुणदोषावर निर्णयासाठी कागदपत्र आवश्यक आहेत. ऋणकोच्या वकिलाचा युक्तीवाद असा की, या घडीला कागदपत्रे दाखल करता येणार नाहीत म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचे प्रकरण हे नुकसानभरपाई वसुलीसाठी दाखल केले आहे. धनकोस कागदपत्र दाखल करण्याची परवानगी दिल्यास ऋणकोचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे हे कागदपत्र दाखल करुन घेणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**<u>आदेश</u>**

कागदपत्र दाखल करण्यास मंजुरी दिली आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.०६/०४/२०२४

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.